म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय ना.वा.
दा. क्र. ४५०३

# सदाफुली

BVBK-0404503




म. ग्रं. सं. ठाणें
विषय बालवाङ्मय
क्र. नं. ५२८

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

काजी ढवळे
समर्थ - सदन
गिरगांव, मुंबई

BVBK-0404503

# सदाफुली

[ शिशुगीतांचा संग्रह ]

लेखक

भवानीशंकर श्री० पंडित

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई

मूल्य सहा आणे

प्रकाशनाचे सर्व हक्क प्रकाशकाकडे.

बक्षीस, उतारे, भाषांतर, ध्वनिमुद्रण,
इत्यादि हक्क कवीकडे.

पहिली आवृत्ति : १९५३

मुद्रक : बा. ग. ढवळे, कर्नाटक मुद्रणालय, चिराबाजार, मुंबई २
प्रकाशक : केशव भिकाजी ढवळे, कर्नाटक हाउस, चिराबाजार, मुंबई २

कांहीं वर्षांपूर्वी श्री० ढवळे ह्यांनीं माझ्या शिशुगीतांचे चार संग्रह प्रसिद्ध केले. त्यांच्याच सहकार्यानें आज हा पांचवा संग्रह प्रकाशांत येत आहे.

पूर्वीच्या संग्रहाप्रमाणेंच सात ते सोळा वर्षे ही मूलपणाची मर्यादा मनांत धरून ह्या संग्रहांतील गीतांची निवड केली आहे. गीतांचा क्रम अगोदर सोपीं व नंतर साधारण कठीण असा पायरीपायरीनें साधला आहे. कठीण शब्दांचे अर्थ तळटीपांत नमूद केले आहेत. गीतांच्या चाली सरळ साध्या योजल्या आहेत. गीतांतील सर्वसामान्य भावना व मनोरंजक कल्पना मुलांमुलींना आवडतील अशी अपेक्षा आहे.

हीं गीतें ह्यापूर्वी आपलेपणानें प्रसिद्ध केलीं ह्याबद्दल आनंद, शालापत्रक, वऱ्हाडशालापत्रक, मुलांचें मासिक, बालबोधमेवा व बालसन्मित्र ह्या नियतकालिकांचा मी आभारी आहें.

भवानीशंकर श्री० पंडित

मराठी ग्रंथ संग्रहालय
नों. क्र. 950482
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
९२८

# अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| | १. सदाफुली ... ... ... | ५ |
| | २. पिलाचा पाळणा ... ... ... | ६ |
| | ३. घड्याळ ... ... ... ... | ७ |
| | ४. कशाला? ... ... ... ... | ८ |
| + | ५. साउली ... ... ... ... | ९ |
| | ६. खुशालचेंडू ... ... ... | १० |
| | ७. काळयांचे ढवळे कसे झाले? ... ... | ११ |
| | ८. उंदिरमामा व चांदूमामा ... ... | १२ |
| + | ९. बेबी आणि टॉबी ... ... ... | १४ |
| | १०. आमचा माणेक ... ... ... | १५ |
| | ११. वाघ ... ... ... ... | १७ |
| + | १२. धावत्या आगगाडींतून ... ... | १८ |
| × | १३. कुमारी मोगरे ... ... ... | २० |
| × | १४. लपाछपी ... ... ... ... | २१ |
| | १५. वेली आणि फुलें ... ... ... | २२ |
| + | १६. फसगत ... ... ... ... | २३ |
| | १७. डोंगर व झाड ... ... ... | २४ |
| × | १८. वारा ... ... ... ... | २५ |
| | १९. पावसाळ्यांतील एक पहाट ... ... | २७ |
| × | २०. ओहळ आणि समुद्र ... ... | २८ |


× रूपांतरित अथवा अनुवादित.

+ केवळ कल्पनेपुरता आधार.

१५०५२

# सदाफुली

[ हींशी 'वाटलें नाथ हो' प्रमाण

ही सदाफुली बघ ! सदाकदा फुललेली
ही कधीं न हिरमुसलेली

किति तऱ्हेतऱ्हेचीं फुलें उमललीं भंवतीं
कुणि सुरंगरंजित, कुणी सुगंधित असती,
कुणि विलक्षणाकृति, कोणी कोमलकांती,
ही सर्वांहून निराळी !

हिज मुळीं न माहित चटोर नागर नखरा,
लव हिला न शिवला चवचालींचा वारा,
ही पुढें पुढें नच करी, न मिरवी तोरा,
ही अगदीं साधी भोळी !

धगधगे भोंवतीं ऊन तरि न तापे ही,
पाऊस झिमझिमे ही त्रासे न तरीही,
थरथरे हींव ही त्यास जुमानित नाहीं,
ही प्रसन्न राहि त्रिकाळीं !

रंजित = रंगलेली. विलक्षणाकृति = विचित्र आकाराची.
नागर = शहरांतला.

# पिलाचा पाळणा

[ 'झिम् पोरी झिम्' ह्या ओळीप्रमाणें

डोल पिला ! डोल्,
घरट्याचा दोल्

निवांत नि शांत्
डहाळ्यांच्या आंत्

नाजूक लहान्
आहे किती छान् !

झुळुकीनें गार्
हले डुले फार्

झोके घेई फूल्
तसा तूंही झूल्

झूल पिला ! झूल्
चिऊचें तूं मूल्.

कोठें तरी दूर्
चिऊ गेली भूर्,

धाव तिची लांब्
थोडा वेळ थांब् !

परत येईल्
तुला ती घेईल्,

खाऊ ती आणील्
तुला भरवील्,

अंगाई गाईल्
तुला निजवील्

हलवील दोल्
डोल पिला ! डोल्.

दोल = पाळणा.




[ तीन अक्षरी छंद, दुसऱ्यावर टाळी.

.१.

सकाळ,
दुपार,
असूं द्या
कीं रात्र ;
घड्याळ
हें टाळ
कूटतें
त्रिकाळ ;
टिक्‌टिक टिक्‌टिक.

.२.

टिक्‌टिक
टिक्‌टिक
करतें,
आणिक
अधून
मधून
वाजतें.
टण्‌टण
टिक्‌टिक टिक्‌टिक.

.३.

विसावा
असावा
कसा तो
ना ठावा !
वेळ तो
पळतो
थांबेना
पळतो !
टिक्‌टिक टिक्‌टिक.

.४.

विपळें
नि पळें,
प्रहर –
चालले,
चोवीस
हे तास ;
संपला
दिवस !
टिक्‌टिक टिक्‌टिक.

.५.

तोंडाळ
घड्याळ
हें तरी
खुशाल –
गड्‌बड
बड्‌बड
करतें
अखंड ;
टिक्‌टिक टिक्‌टिक.

विपळें = सेकंड. पळें = मिनिटें.




[ पहिल्या दोन ओळी व तिसरीचा उत्तरार्ध
' नदीच्या पैलारू ' प्रमाणें. तिसरीचा पूर्वार्ध
' आकाशींच्या तारांसंगें ' प्रमाणें.

" गोठ्यांत कशाला –
बांधली कपिला ? "
" देते ना ती गोड दू दू आपुल्या बाळाला. "

" दारीं कां म्हणून –
मोत्याचें ठिकाण ? "
" करतो ना पहारा तो रातीं जागून. "

" घरांत कशास –
मनीची मिरास ? "
" करते ना धान्यखाऊ ' मामां 'चा ती नाश "

" कशाला पंजरीं –
राघोबा भरारी ? "
" रिझविती ना ते बोल बोलून सुस्वरीं. "




[ आखूड ओळ ' अंबा पिकतो ' प्रमाणें व
लांबट ' कोंकणींचा राजा बाई ' प्रमाणें.

कोण गे ! आई तिन्हीसांजा होतांच ही धावत येई ?

पहा ना ! कशी माझ्यामागें लगबगा शिरे ही अशी !—
नि वेळोवेळीं माझ्याप्रमाणें ही हाले चाले आपुली !

माझ्यासारखी आहे दिसावयाला ही हुबेहूब कीं !
बसे बसतां, उठतां मी उठे, पडे खालीं पडतां ;

पण कां होई घटकेंत उंच घटकेंत ठेंगू ही ?
हीस धरावें तर हात लागून ही निसटे जवें

काळी ही किती ! भुई भिंतीवर खेळे खिदळे बेटी !
बोलेना मुळीं ! आळीमिळी गुपचिळी दांतांना खिळी !

जवें = वेगानें.




[ ' आनंदीआनंद गडे ' प्रमाणें.
लांबट ओळींत दोन मात्रा अधिक.

खुशालचेंडू हा चेंडू
उडे बागडे कसा चहुंकडे जरा न लागे जों दांडू.

घडींत उसळुन उंच उडे,
घडींत घसरुन खालिं पडे,
घडींत सांदिंत आड दडे,
भंवतीं भिरभिर पाहत डोळे म्हणती, " या ! याला धुंडूं. "

किती चपळ ! अति अवखळ हा !!
नको विसावा यास पहा !
बघुन मोकळ्या दिशा दहा –
म्हणतो, " माझ्या मागें मागें पळा, चला ! मिळुनी हिंडूं "

भुंग्यापरि हा स्वच्छंदी
सदासर्वदा आनंदी
कधींहि न उतरे धुंदी ;
यासह नाचत खेळ खेळतां हसें लागतें ओसंडूं.



# काळ्यांचे धवळे कसे झाले?

ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. वा. ९२८

[ ‘चिंव चिंव चिमणी छतांत छतांत’ प्रमाणें

— १ —

काळे गोरे न्हाणिघरीं । न्हाणिघरीं
होते दोघे शेजारी । शेजारी
काळे होते खोक्यांत । खोक्यांत,
गोरे साबण पेटींत । पेटींत.

— २ —

कांहीं कारण नसतांना । नसतांना
गोरे वद्ले काळ्यांना, । काळ्यांना,
‘ काळे ! तुम्हां रंग नसे । रंग नसे,
ओबडधोबड अंग असे । अंग असे,
हात न लावी तुम्हां कुणी । तुम्हां कुणी
चिमटा चिमटे घे धरुनी । घे धरुनी,
तोंड लपवितां कां इकडे ? कां इकडे ?
चुलींत खुपसा जा तिकडे । जा तिकडे
नाहींतर मी मऊ किती । मऊ किती,
माझी पाहुन घ्या कांती । घ्या कांती ’

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
नों. नं.

— ३ —

यावर काळे तडतडले, । तडतडले,
भडका उडुनी बडबडले । बडबडले,
आणिक त्यांनीं रागांत– । रागांत –
उडी टाकली बंबांत ! । बंबांत !
झाले इतुके ते लाल– । ते लाल —
त्यांचा उठला कीं लोळ ! कीं लोळ !

— ४ —

राग तयांचा शमवाया । शमवाया
तेथें आले तों 'अय्या' । तों 'अय्या
शेक लागला परि त्यांना । परि त्यांन
काळे झाले हात पुन्हा । हात पुन्हा ;
गोऱ्यांना ते बोलविती । बोलविती
बसली त्यांना पण भीती । पण भीती
त्यांच्या तोंडीं ये फेस, । ये फेस,
समूळ त्यांचा हो नाश ! हो नाश !

— ५ —

राख घातली डोक्यांत । डोक्यांत
झाले काळे मग शांत । मग शांत
होते आधीं ते काळे । ते काळे
पुढें जाहले पण ढवळे ! । पण ढवळे !

विभूतिचर्चित = भस्म लावलेले.

# उंदिरमामा व चांदूमामा



[ साक्या

उंदिरमामा म्हणजे आधीं अर्धा मुर्धा जीव
त्यास बघावें आणि करावी कुणिही त्याची कींव ;
काळा करडा रंग तयाचा, मिशा मुखाहुन मोठ्या,
किरटे किरटे पाय तयाचे म्हणजे खुरट्या कांट्या ;
परी तयावर स्वार जाहले जाड गणपती बाप्पा
रोड बिचारा उंदिरमामा टाकुं लागला धांपा,
मजेदार ही सर्कस बघुनी चांदूमामा हसला
गणपतिबाप्पांना तो फिदिफिदि हसतेवेळीं दिसला ;
साहजीक तों संतापें ते झाले अगदीं लाल
शाप बोलले, “आतां चंद्रा ! होतील तुझे हाल ;–
भाद्रपदांतिल चतुर्थीस जो बघेल तुजला पोर
खोटा येइल आळ तयावर ठरेल जगिं तो चोर ;–
लहान मोठा होशिल तूं तुज अक्षय क्षय लागेल
अधुनी मधुनी राहू राक्षस ग्रास तुझा मागेल.”
उंदिरमामालागिं अकारण चांदूमामा हसला
म्हणुन पावला डाग आणि शिरिं शाप घेउनी बसला.




[ साक्या

जिकडे जिकडे जाई बेबी तिकडे तिकडे टॉबी,
बेबी तिकडे हटकुन टॉबी, टॉबी तिकडे बेबी;
सकाळ झाली आणि निघाली शाळेलागीं बेबी
मागें मागें तिच्या चालला जीभ काढुनी टॉबी.
फ्रॉक गुलाबी, बूट तपकिरी, विंचूवेण्या काळ्या,
मोजे म्हणजे बारिक बारिक निळ्या जांभळ्या जाळ्या-
असा बेबिचा असे निराळा नखरा नट्टापट्टा,
थाट टॉबिचा अगदीं साधा गळ्यांत केवळ पट्टा!
दहा वाजले घण घण घण घण पहिली घंटा झाली
अगदीं वेळेवरतीं बेबी वर्गामध्यें गेली;–
तिच्या मागुनी शिरला टॉबी, तोंच पातल्या बाई,
उभ्या राहिल्या मुली! जाहली एकच गर्दी-घाई!!
टॉबिस बघुनी बाई झाल्या आश्चर्यानें चकित
शू शू करुनी त्यास लागल्या तेथुन हाकूं त्वरित.
भों भों भों भों भुंकत सुटला बाईवरतीं टॉबी!
खो खो खो खो खूप हासल्या मुली आणखी बेबी!!


# आमचा माणेक



[ आनंदी आनंद गडे

गडी आमुचा माणेक
म्हणजे चीज असे एक!
विड्या तयाच्या कानशिलीं
आणिक तुटक्या पेनसिली;
सुया टाचण्या हव्या जर
टोपिंत त्याच्या त्या हजर;
कडोसरीला तपकीर,
चिल्लर पैसे दो चार;
तंबाखूचा बार मुखीं,
नको परी ती त्यास सुकी.
चुना भिंतिचा खरडून
बनवी मिश्रण तो छान;
चष्मा लावी तो डोळ्यां
त्यास बांधल्या शें सुतळ्या.
अंगठ्यास फासुन शाई
तो तावावर करी सही;
थाटमाट त्याचा बघुनी
हसती सारे खदखदुनी.
गडी आमुचा 'माणेक'
म्हणजे रत्न असे एक!

# वाघ



[ दिंड्या

दोन पायांचा वाघ हा नवाच
  बँडताश्यांच्या तालिं करी नाच
निघे याची रस्त्यामधून स्वारी
  उड्या वेड्यावाकड्या खूप मारी.

सर्व अंगाला फासला सफेदा
  त्यांत पिवडीचा मिसळला लवेदा,
लांब काळे वर ओढले फराटे,
  मुखीं चिकटविली जीभ चार बोटें ;

आणि डोईला घातली दुटप्पी
  व्याघ्रचर्माची तंग कानटोपी,
गळ्याभंवतीं आयाळ कां ? — कळे ना !
  वाघ किंवा हा सिंह ओळखा ना ?

अलग याचें शेंपूट जाडजूड
  तें न सावरतां येइ यास धूड
म्हणुन धरती तें उंचलून मित्र
  असे वाघाचें सर्व या विचित्र !

नाचनाचुन हा वाघ भागला कीं
बसायाला याला मिळे दुचाकी,
श्यार भिंगाचा ज्यास कडा चार-
मिळे चष्माही थंड थंड गार.

तलफ गांजेची भागवावयास
क्षणाचाही लागेन उशिर यास
जोर लावुन हा आंत चिलिम ओढी
धूर नाकांतोंडांमधून सोडी.

खरा आला जर वाघ यासमोर
पळुन जाइल हा वाघ पार दूर
हवें ताजें खायास त्यास मांस
रेवड्यांची पाहिजे यास रास.

व्याघ्रचर्मांची = वाघाच्या चामड्याची. श्यार = काळाभोर. दुचाकी = सायकल.

# धांवत्या आगगाडींतून



[ तेरा अक्षरी छंद : प्रति चौथ्यावर टाळी.

वाजे घंटी फुंकी शिटी ही आगगाडी
धाडधाड खाडखाड टेशण सोडी,
नाकांतून फेकी उंच धूराचा लोट,
भराभरा टाकी पाट्या, टाकी फलाट,
उंच उंच दिवे जाती, सिग्नल जाती,
साऱ्या मुलूखाची हिला घाई ही किती !
लांब लांब धाव घेती तारांचे खांब
सोय नाहीं म्हणायाची कोणाला 'थांब !'
घरें दारें, पेठा वाटा, शहर सरे
आगगाडी आतां दूर रानांत शिरे
धूमधडाक्यानें धावे पुढें पुढें ही
पृथ्वी सारी हिच्यासंगें धावत राही.
डोंगराच्या रांगा, दऱ्या, खोरीं कपारी,
बागा, मळे, नद्या, नाले, पूल, विहिरी,
झाडेंझुडें, शेतकरी, शेतें, कुंपणें,
पक्षी, गुरेराखी, गुरेंढोरें, कुरणें–
आगें आगें जों जों धावे ही वेगें वेगें
वेगें वेगें तों तों जाती हीं मागें मागें.

हरिणांचा कळप हा पळे इकडे,
जंगलांत गांवढें तें दडे तिकडे
यांवरीं जों दृष्टी पडे ना ओझरती
समोरीं तों झट्ट निसटे ही पुरती!
सपाट्यानें झपाट्यानें धावे अशी ही
विसावा तो कसा हिला ठाउका नाहीं!
डोकावतां जाळीवाटे रातीं बेरातीं
धस्स होई अन् दडपे भीतीनें छाती
उडती जों तेवढ्यांत ठिणग्या लाल
वाटे पळे काळोखांत आग्यावेताळ
दिसतां तो आगगाडी किंकाळी फोडी
फुस्स सुस्स फुस्स सुस्स सुस्कारे सोडी.
आभाळाच्या रोखेंरोखें सरळ कधीं,
नागमोडी वळणानें वाकड्या कधीं
जुन्या गप्पागोष्टींतल्या राक्षसांपेक्षां,
स्वप्नांतल्या उडणाऱ्या अप्सरांपेक्षां—
आगगाडी धाव घे ही जोरानें जास्त
वाऱ्यानेंही हिच्यापुढें टेकले हात.
हिची काय चढाओढ पृथ्वीशीं लागे?
धावधावेल ही किती अशी ती सगें?
धावण्यानें हिच्या ती का कधीं सरेल?
पुरूनही हिला आणखी ती उरेल!
धाव धावून ही बेटी थकेल अंतीं
घेईल नी मुक्कामाला मग विश्रांती.




[ दिंड्या

उन्हाळ्याच्या दिवसांत मी पहाटे
हिंडतांना बागेंत मला भेटे
गोरटेली नाजूक एक पोर
एकटी ती कोणी न सभोंवार.

असे साडी हिरवी तिची झकास
जणूं गिरणींतिल माल नवा खास
मनीं आली मम कल्पना खुशाल—
"काय मजला ही 'आपुला' म्हणेल"

तिला केला मी लवुन नमस्कार
आणि वदलों तिजसवें शब्द चार
तोंच मुरका मारून एक गोड
तिनें नेलें बाजूस जरा तोंड.

मनीं ठसली ती तोंच अशी कांहीं
मला अगदीं मग राहवलें नाहीं
दंवानें ती अति आर्द्र जरी होती
चुंबिली मी उचलून मुखाशीं ती.

तिला हलकें हातांत घेउनी मी
प्रेमभावानें आणिलें स्वधामीं
मनीं म्हटलें कीं, ही उद्यां फुलेल,
आणि मजलागीं 'आपुला' गणेल.

बघे तिज मी जों पहाटे उठून
तिचा गेलेला नूर पालटून
सांडपाटाच्या लगत लागलेली
असे सुंदर ती मोगरी दुधाळी!

झकास = छान. दुधाळी = दुधासारखी पांढरी.




[ ओंव्या

एका एका पानासवें
  खेळे लपाछपी वारा,
लपाछपी ढगासवें
  खेळे एक एक तारा,

खेळे चांद लपाछपी
  एका एका पाकळीशीं,
एक एक लाट खेळे
  लपाछपी किनाऱ्याशीं ;

रोज मीही आपुल्याशीं
  खेळे अशी लपाछपी
जागा होतों पहाटेला
  आणि रात्रीं जातों झोपीं.

म. प्रं. सं. [illegible] शा[illegible].
ग्रा. क ........ नों. दि ........
वि. ........ क. ........




[ आनंदी आनंद गडे

फुलें म्हणालीं वेलीला,
  "लोटूं नको आम्हां बाळां
आई, आम्ही तुजपाशीं
  हासत राहूं सदा अशीं.
तुझ्यापासुनी आई गे
  दुरावलों जरि दुर्भाग्यें
विकलीं गेलों हाटांत,
  सजूं प्रभुशिरीं थाटांत
विभूति-सन्मानार्थ झटूं,
  रमणीच्या केशांत नटूं
वा शृंगारूं फुलदाणी
  नेवो आम्हांलागिं कुणी.
राहिलों न जरि आम्हि इथें
  विसरूं न आई तरि तूंतें
जिथें जिथें आम्ही जाऊं
  तिथें तिथें तव यश नेऊं."

विभूतिसन्मानार्थ = थोर पुरुषांचा आदर करण्यासाठीं.



[ पादाकुलक

फुलाफुलावर दलादलावर
माणिकमोत्यें पडलीं सुंदर

'या ! या ! घ्या, घ्या खुशाल उचलुन '–
चमक तयांची हीच करी खुण.

उचलुन घ्याया तयांस हातीं
हासत हासत झालों पुढतीं

तोंच आपुल्या हजार हातीं
उचलुन नेई सूर्य त्यांप्रती.

~~~~
~~~~




[ शार्दूलविक्रीडित

वारा, पाउस, ऊन सोशित वनीं वर्षानुवर्ष स्थित —
डोकें उंच करून ताठ अगदीं होता कुणी पर्वत ;
त्याच्या ठोकळ पायथ्याजवळ ये जन्मास कोणी तरू
बुंध्यापासुन धूडवाढ वरतीं त्याची हळू हो सुरू.

गर्वे तो तरु एकदां बडबडे, "होईन मी उन्नत
माझ्या उंचपणापुढें न टिकुनी राहील हा पर्वत !"
वर्षे पाउस आणि उंचपण जों होई तयाचें दुणें
आनंदातिशयें तयास पळ तों आकाश हो ठेंगणें ;

नाचे तो मग सारखा थयथया नादामधीं आपुल्या
हासे पाहुन पर्वतास तिळ ना संकोच लज्जा तया,
राही धीर गभीर पर्वत परी त्याची न शांती ढळे
जाई तो तरु ज्यास्त ज्यास्तच पुढें शेफारुनी त्यामुळें ;

एकाएकिंच एकदां कडकडे तों त्यावरी विद्युत
मुळापासुन तो पडे ! स्थिर परी राही स्थळीं पर्वत !!

:वीज.




[ साक्या

कां हा वारा सैरावैरा लागे माझ्या मागें ?
इवल्याशा या खोलिंत माझ्या इच्छि रहाया संगें ;

दुनिया सगळी यास मोकळी घालाया धुडगूस
आंत यावया मना करी या मी – म्हणुनी कां रोष ?

स्वस्थ न राही हा पळभरही परी करी सावेश –
खिडकीपाशीं उंबरठ्याशीं घासाघीस हमेश ;

आणि खिडकिच्या फुटोत कांचा हलकल्लोळीं म्हणुनी –
स्वयेंच आणी अधुनीमधुनी तुफान पाउसपाणी.

गांठी माझा मग दरवाजा ठोठो द्याया थापा
तिथेंच संतत बसे वाजवित कडी आणखी कुलुपा,

कुलुपावरला सारुन बिल्ला किल्ली फिरवित राही,
दम दाबुन धरि, वाट घडीभरि गुपचुप अगदीं पाही,

घडीस दुसऱ्या भयकंपित या दरवाज्यावर वेगें –
धक्के मारी किती कितीतरि पूर्वीहुन अति रागें ;


बोलावी मी आंत कितीदा, " येई ! येई ! येई ! "
तरि तो आंत न येई अथवा तो बाहेरिं न जाई.

मी अनवाणी फरशीवरुनी ओल्या धावत जाई
दारें दोन्हीं सताड उघडुनि धावत परतुन येई,

तसा घुसे तो आंत घाइनें पडे तडक बाहेर
मोडुन फोडुन दारें कांचा करी तयांना जेर!

माझा इवला दिवा विझवला हाच त्यास आनंद
दुनिया सगळी पुन्हा मोकळी उनाडण्या स्वच्छंद.

हात धुउन कां असा सारखा हा पाठीशीं लागे?
इवल्याशा या खोलिंत माझ्या इच्छि रहाया संगें!




[ आनंदाचा कंद हरि हा.

आज पहांटेपासुन आहे वादळवाऱ्याची हवा
तिच्यांत आहे एक तऱ्हेचा गोड गुलाबी गारवा.
निघे न बाहेरीं अगदीं परि सुखांत साखरझोंप घे
आज वळचणीखालीं दोन्ही डोळे मिटुनी पारवा.
दूरदूरवर हिरव्या हिरव्या डोंगरपाखाडीवरीं
चरे मजेनें काळाढवळा शेळ्यामेंढ्यांचा थवा.
निळ्याजांभळ्या आभाळीं हीं मेघांचीं शकलें किती
इकडुन तिकडे तिकडुन इकडे फिरति विमानें स्वैर वा!
सोसाट्यानें सुटे मधें जों सों सों वारें सारखें
हालत डोलत झाडेंझुडपें म्हणती 'वा रे वाहवा'
सर सर सर सर तेवढ्यांत जों सर एकादी कोसळे
गमे मनाला कीं ओघळला सर देवाघरचा नवा.
वृष्टीनंतर सृष्टी सुंदर दृष्टीलागिं दिसे किती
छायांकित कर निज हृदयावर चित्र तिचें हें मानवा!

छायांकित कर = फोटो काढ.




[ शालिनी

अद्रिद्रोणींतून रत्नाकरांत
थेंबें थेंबें स्रोत होता वहात
हेवा त्याचा वाटला त्या मदांधा
कोपें गर्जे, "इच्छिसी काय मंदा ?–

रोधी मातें कोण रे ? मी अफाट !
आकाशाची चालतों दूर वाट !
मी ओजस्वी, चंड, दुर्मेय आहे !
बिंदूसिंधू कासया अर्पिसी हे ?"

तेव्हां बोले स्रोत शालीन त्याला,–
"सिंची मौनें मी तुझी उग्रवेला
बंधो ! तूं जो बिंदु द्याया अशक्त
देतों तो मी मार्गणा प्राशनार्थ."

अद्रिद्रोणी = डोंगरघळ. रत्नाकर = समुद्र. स्रोत = ओहळ. मंदा = मंद मंद वाहणाऱ्या किंवा मूर्खा. ओजस्वी = पराक्रमी. चंड = रागीट. दुर्मेय = मोजमापास कठीण. उग्रवेला = भयाण किनारा. मार्गण = वाटसरू.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
धा. क्र. ९२८
वाचनालय शाखा

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
नों. क्र. १५०५३

# जें येईल तें गाणं म्हण....

लहानग्या छोटीला आजच बालमंदिरांत आईनें नेऊन बसविलं होतं. बाकीचीं मुलं गाणीं म्हणत असतां ती एकटीच एका बाजूला गप्प बसली होती. तिच्याजवळ येऊन बाई म्हणाल्या, "तूं कां ग गप्प? तुला जें येईल तें गाणं म्हण."

पण छोटीला गाणं येत होतं कुठें? आईनें शिकविलेले श्लोक नि कविता म्हणून दाखविण्याची तिला लाज वाटली. ती आणखीच खट्टू होऊन बसली. मुलं टाळ्या वाजवून ओरडलीं, "ओ हो! एका मुलीची फजिती ऽऽऽ!"

बाकीच्या मुलांना तरी आपोआप थोडींच गाणीं म्हणायला येत होतीं! त्यांच्या वडिलांनीं खूपखूप पुस्तकं आणलीं होतीं व आईनें त्यांतील गाणींच मुलांना शिकविलीं होतीं.

कितीतरी मजेदार नि सुंदर सुंदर गाण्यांचीं नि कवितांचीं पुस्तकं आमच्याकडे आहेत. पुढील नांवं नुसतीं वाचलीं तरी मुलांना वाटेल कधीं एकदा बाबा आपल्याला हीं पुस्तकं आणून देताहेत!

जाईचा कुंज, कुसुमाग्रज ६ आ.
अभिनय गीत, वा. गो. मायदेव ६ आ.
शिशुगीत, वा. गो. मायदेव ६ आ.
बालविहार, वा. गो. मायदेव ६ आ.
क्रीडागीत, वा. गो. मायदेव ६ आ.
छंदगीत, वा. गो. मायदेव [illegible] आ.
बीजेची कोर, म. श्री. पंडित ४ आ.
गूळखोबरं, [illegible] ४ आ.
चैत्रपालवी, वि. म. घुले ३ आ.
किलबिल, वा. गो. मायदेव ३ आ.
मोतीबाग, यशवंत १० आ.
चांदोबाच्या निळ्या घरीं, अशोक १२ आ.
चिमुकलीं बालगीतें, वैद्य ४ आ.
प्रार्थनागीतावलि, रायकर ४ आ.
विद्यामंदिरांतील गीतांजलि, तांदळे व लोंढे, २ आ.
फुलबाग, भा. म. वैद्य ४ आ.
किशोरसंगीत, वीरकर व मटंगे १४ आ.
मीठे अंगूर, स. अ. शुक्ल ८ आ.
अंगाई गीतें, ग. का. रायकर ४ आ.
मुलांचा आनंद, दा. वि. फफे ४ आ.
दिवाळीची देणगी, रायकर २ आ.
रवींद्रनाथांचा शिशु, म. का. कारखानीस १ रु.
राष्ट्रबोध, या. मु. पाठक २

यांखेरीज आणखींही बरींच आहेत. यादी मागवा.

केशव भिकाज[illegible], मुंबई

BVBK-0404503